अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । सोमवार, दि. २३ फेब्रुवारी २०२६ । ▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : १४६ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

## शरद पवारांची प्रकृती पुन्हा बिघडली, दवाखान्यात दाखल



पुणे : राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांना पुन्हा एकदा पुण्यातल्या रूबी हॉल क्लिनिक या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. शरद पवार यांची प्रकृती मागील आठवड्यात बिघडली होती त्यांना रुग्णालयात आणण्यात आलं होतं. पण चार दिवसांनी त्यांना रुग्णालयातून सुट्टी देण्यात आली. रविवारी शरद पवार यांना पुन्हा त्रास जाणवू लागला. त्यामुळे त्यांना पुन्हा पुण्यातल्या रुबी हॉल क्लिनिक रुग्णालयात दाखल करण्यात आली.

प्राथमिक माहितीनुसार, शरद पवार यांना काहीसा अशक्तपणा जाणवत आहे. त्याांच्या शरीरातील पाण्याची पातळी कमी झाल्याने त्याांना अशक्तपणा जाणवत असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे रुबी हॉस्पिटलमध्ये त्यांना सलाईन लावली जाईल, अशी माहिती आहे. अशक्तपणा वगळता शरद पवार यांची प्रकृती पूर्णपणे स्थिर आहे. अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर शरद पवार हे अनेक दिवस बारामतीमध्ये होते. त्यांनी सुनेत्रा पवार, पार्थ पवार, जय पवार यांच्या भेटीगाठी घेऊन पवार कुटुंबाला सावरण्याचा प्रयत्न केला होता. यादरम्यान, अचानक त्यांची प्रकृती बिघडली होती.

## एका जिद्दी मुलीचा सासरच्यांनी घोटला गळा

# तळ हातावर मेहंदी कोरण्याऐवजी

# स्वप्नभंग लेकीनं लिहिली सुसाइड नोट!

सोलापूर/प्रतिनिधी




**हातावर मेहंदी कोरण्याऐवजी अभागी विवाहित तरुणीला स्वत:च्या आत्महत्येची सुसाईट नोट कोरावी लागली. स्वत:च्या पायावर उभं राहण्याचं अभागी लेकीचं स्वप्न सासरच्या मंडळींनी पायदळी तुडवलं. स्वप्नाची राखरांगोळी झालेल्या विवाहित तरुणीला वेदना तळहातावर कोरुन स्वत:ला संपवावं लागलं. तळहातावर सुसाईट नोट लिहण्याचा फलटणच्या डॉ. संपदा मुंडेंचा पॅटर्न माळशिरस तालुक्यात दिसला. खुळेवाडीमधील हृदयस्पर्शी घटनेनं अक्षरश: समाजमन हळहळलं.**

''हसू झालंय माझं.., माझं पार्लर बंद केलं.., जीव होता तो माझा.. स्वप्न होतं गं..!'' आत्महत्येपूर्वी एखाद्या मुलीने आपल्या हातावर असे शब्द कोरावेत, यापेक्षा मोठे दुर्दैव ते काय? माळशिरस तालुक्यातील खुळेवाडी येथे एका २२ वर्षीय विवाहितेने सासरच्या छळाला कंटाळून आपली जीवनयात्रा संपवली. पायल रणदिवे असे या दुर्दैवी तरुणीचे नाव असून, स्वत:च्या पायावर उभे राहण्याचे तिचे स्वप्न सासरच्यांनी पायदळी तुडवल्याने तिने हे टोकाचे पाऊल उचलले. याप्रकरणी पोलिसांनी पतीसह सासू-साऱ्याला बेड्या ठोकल्या आहेत. अनैतिक संबंधात अडथळा ठरणाऱ्या सासूला मारण्यासाठी एका महिलेने विषप्रयोग केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेत सुदैवाने सासू वाचली असून आरोपी महिलेचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनैतिक संबंधात अडथळा ठरणाऱ्या सासूला मारण्यासाठी एका महिलेने विषप्रयोग केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेत सुदैवाने सासू वाचली असून आरोपी महिलेचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार पंढरपूर तालुक्यातील उंबरगाव येथील आरोपी महिलेचे गावातीलच एका व्यक्तीशी कथित अनैतिक संबंध होते. या प्रकरणाची कुणकुण सासूला लागली होती. यावरूनच सासू-सुनेचा वाद होत होता.

दरम्यान आरोपी महिलेच्या प्रियकराने तिच्याजवळ एक विषारी औषध असलेले बाटली दिली. यानंतर आरोपी महिलेने विषारी औषध सासू पाणी पिते त्या भांड्यात टाकले. अशा प्रकारे सासूला मारण्यासाठी सूनेने कट रचला. रात्री सासूने त्या भांड्यातील पाणी पिले. मात्र चव कडू लागल्याने पाण्याचा तांब्या जेवण करत असलेल्या मुलगा समाधान जवळ ठेवला. समाधान यांनी ते पाणी पिले. यानंतर समाधान यास रात्री उलट्या होऊ लागल्या. त्यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल केले. परंतु त्यांचा मृत्यू झाला. सासूला मारण्यासाठी सूनेने केलेल्या विष प्रयोगात स्व:च्याच नवऱ्याचा जीव गेल्याची घटना झाली. या प्रकरणी पंढरपूर ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आरोपीला पोलिसांनी अटक केले असून चौकशी सुरू आहे.

परंतु त्यांचा मृत्यू झाला. सासूला मारण्यासाठी सूनेने केलेल्या विष प्रयोगात स्व:च्याच नवऱ्याचा जीव गेल्याची घटना झाली. या प्रकरणी पंढरपूर ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आरोपीला पोलिसांनी अटक केले असून चौकशी सुरू आहे

- ‘स्वप्न होतं माझं, पण हसू झालं...’ वेदना कोरुन संपवलं स्वत:ला !!
- फलटणचा डॉ. संपदा मुंडेचा पॅटर्न माळशिरस तालुक्यात खुळेवाडीमधील हृदयद्रावक घटनेनं हळहळलं समाजमन
- स्वत:च्या पायावर उभं राहण्याचं अभागी लेकीचं स्वप्न तुडवलं पायदळी



### हातावर लिहिलेली ‘सुसाईड नोट’ वाचून चिरलं काळीज

पायलला ब्युटी पार्लर सुरू करून स्वतः ची ओळख निर्माण करायची होती. तिने त्यासाठी क्लासही लावला होता. मात्र, सासरच्या मंडळींनी तिचे हे पार्लर बंद पाडले. शनिवारी सायंकाळी पायलने राहत्या घरी गळफास घेतला. धक्कादायक म्हणजे, तिने कागदावर चिठ्ठी न लिहिता आपल्या हातावरच मृत्यूच्या वेदना लिहिल्या होत्या. आजवर शांत बसले पण आता नाही... चांगल्या आई-बापाची लेक आहे म्हणून निघून गेले नाही.. माझ्यामुळे त्रास झाला असेल तर ‘सॉरी’, असे शब्द वाचताना उपस्थितांच्या डोळ्यांत पाणी आले.

### अंगावर मारहाणीच्या खुणा; आत्महत्या नसून घातपात, माहेरच्या मंडळींचा संताप

पायलचा हा मृत्यू केवळ आत्महत्या नसून सासरच्यांनी केलेला छळ असल्याचा आरोप तिच्या वडिलांनी केला आहे. पायलच्या मृतदेहावर मारहाणीचे व्रण आणि जखमा आढळून आल्या आहेत. तिचे स्वप्न हिरावून घेत तिला शारीरिक आणि मानसिकरीत्या प्रचंड त्रास दिला जात होता, असे तक्रारीत म्हटले आहे. एका जिद्दी मुलीचा सासरच्यांनी गळा घोटला, अशा भावना तिचे मामा गणेश कदम यांनी व्यक्त केल्या.

### पतीसह सासू-सासरे गजाआड, दीर मात्र फरार

या घटनेनंतर नातेपुते पोलीस ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. पोलिसांनी पायलचा पती, सासू आणि सासरा अशा तिघांना तातडीने अटक केली आहे. या प्रकरणातील चौथा आरोपी (दीर) अद्याप फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. एका शिकलेल्या आणि स्वप्न पाहणाऱ्या लेकीचा असा करुण अंत झाल्याने संपूर्ण माळशिरस तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे.

### नवरा-बायकोमध्ये वादाचे उडत होते खटके

मृत पायल आणि तिचा अटकेतील नवरा शशिकांत यांच्यामध्ये वादाचे खटके उडत होते. या दोघांचा २०२१ मध्ये विवाह झाला होता. पायल हिनं ब्युटी पार्लर चालवू नये, अशी भूमिका शशिकांत याची होती. संसारासाठी मी पैसे कमावून आणतो, मात्र तुझे ब्युटी पार्लर चालू ठेवायचे नाही, या भूमिकेवर शशिकांत ठाम होता. त्यावरुन होत असलेली भांडणे घरच्यांनी मिटवली होती, मात्र वाद धुपसत होता. याच टप्प्यावर पायलने टोकाचा निर्णय घेऊन स्वत:ची जीवनयात्रा कायमची संपवली.

### ड्रिंकर शशिकांतचा पायलला आला होता वीट

मृत पायलचा नवरा हा सतत दारुच्या नशेत असायचा. एकीकडे तो फार काही कमावत नसायचा आणि दुसऱ्या बाजूला बायको पायल हिस पार्लर चालवायचे नाही, असं हेका धरायचा. त्यावरुन भांडणं काढायचा. त्याचा या नेहमीच्या कटकटीचा त्रासानं मृत पायल वैतागून गेली होती. त्याच्या आडमुठीपणाच्या वागण्याचा तिला अक्षरश: वीट आला होता, असे तिच्या मामाकडून सांगण्यात आले.

### घातपात नव्हे, आत्महत्याच, पोलिसांची प्राथमिक माहिती

मृत पायल हिचा घातपात नव्हे, तर तिने आत्महत्या केली. साडीच्या साह्याने तिने गळफास लावून घेतला. आत्महत्येदरम्यान रुमला आतून कडी घातलेली होती, असा प्राथमिक माहिती असल्याचे नातेपुते पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक विशाल वायकर म्हणाले. मृत पायलच्या मृत्यूला कारणीभूत असलेल्या संशयित दिराचा शोध सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.पायलच्या आत्महत्येदरम्यान तिचे घरातील सासू-सासरे कामाला गेले होते.नवरा बाहेर गेलेला होता. दीर जनावरांचे पशुखाद्य आणायला गेला होता. मृत पायल घरी एकटीच होती असेही त्यांनी घटनेच्या अनुषंगाने, अधिक माहिती देताना दैनिक ‘सुराज्य’ सांगितले.

## चौकीत घुसून पोलीस अधिकाऱ्यासह होमगार्डची गोळ्या झाडून हत्या

गुरुदासपूर

### पंजाब हादरले!

पंजाब राज्यातील गुरदासपूर जिल्ह्यात मध्यरात्री पोलीस चौकीवर तैनात असलेल्या दोन पोलीस कर्मचाऱ्यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. ही घटना सीमावर्ती भागातील दोरांगला पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आदिया गावात शनिवारी मध्यरात्री एकच्या सुमारास घडली. गोळ्या नेमक्या कोणी झाडल्या, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन्ही पोलीस कर्मचाऱ्यांचे सर्व्हिस वेपन घटनास्थळावरून जप्त करण्यात आले आहे.

वरिष्ठ गुप्तचर अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, तपास पथक मृतांचे फोन तपासत आहे, जेणेकरून घटनेशी संबंधित महत्वाचे धागेदोरे मिळू शकतील. होमगार्ड अशोक कुमार आणि पंजाब पोलीसचे एएसआय गुरनाम सिंह यांची हत्या झाली आहे.

घटनेची माहिती मिळताच गुरदासपूरचे एसएसपी आदित्य शर्मा यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांच्यासोबत फॉरेन्सिक टीमनेही पाहणी केली. याशिवाय बीएसएफचे डीआयजी जेके विरदी हे देखील घटनास्थळी पोहोचले. एसएसपींनी सांगितले की, दोघे चौकीच्या खोलीत मृतावस्थेत आढळले. पोलीस या प्रकरणाचा विविध अँगलने तपास



गुरुनाम सिंह अशोक कुमार

करत आहेत.

या घटनेचा गँगस्टर आणि दहशतवादी अँगलने देखील तपास केला जात आहे, जेणेकरून कोणत्याही संभाव्य कटाची शक्यता नाकारता येणार नाही. याच दरम्यान, या घटनेवरून विरोधी पक्ष काँग्रेसने आम आदमी पार्टी सरकारच्या काळातील राज्यातील सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

पंजाब काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अमरिंदर सिंह राजा वारिंग यांनी या प्रकरणावर म्हटले आहे की, ''गुरदासपूर जिल्ह्यातील अधियान गावात एका चेकपोस्टजवळ आमच्या दोन पोलीस कर्मचाऱ्यांची गोळ्या झाडून हत्या होणं ही अत्यंत चिंतेची बाब आहे. आम्ही राज्य आणि केंद्र सरकारला विनंती करतो की, त्यांनी या हत्येचा सखोल तपास करून दोषींना कठोर शिक्षा द्यावी. आपल्या राज्याच्या आणि देशाच्या सुरक्षेच्या बाबतीत आपण संघटित राहायला हवे.''

ICC MEN'S T20 WORLD CUP

**आजचा सामना**

वेस्ट इंडिज v/s झिम्बाब्वे

स्थळ : वानखेडे, मुंबई
वेळ : सायंकाळी ७ वाजता

**तिसरा डोळा**

– प्रकाश पोरे




जागतिक समस्या !

4 8 0

## प्रेमाच्या गुर्टरगुम प्रकरणात सुनेनं रचला कट हादरलं पंढरपूर !

पंढरपूर/प्रतिनिधी

गावातील एका व्यक्तीबरोबरच्या प्रेमाच्या गुर्टरगुम प्रकरणात अडसर ठरणाऱ्या सासूला विष प्रयोगातून मारण्याचं कांड सुनेनं आपल्या प्रियकराच्या मदतीनं रचलं खरं मात्र त्यातून घडलं ते भयंकरच. विष प्रयोग झाला तो नवऱ्यावरच. सासूला कायमचं संपवायला गेली पण नवराच कायमचा संपला असं ते घडलं. पंढरपूर तालुक्याच्या ग्रामीण भागात उंबरगाव इथल्या सिनेस्टाईल लव्ह स्टोरींनं सगळीकडं एकच खळबळ माजली. प्रेम प्रकरणाच्या विष प्रयोगानं पंढरपूर हादरलं. कट रचणारी सून आणि तिचा प्रियकर हे दोघांना याप्रकरणात अटक झाली. दोघांवर बाराच्या भावात जाण्याची परिस्थिती ओढावली.

त्याचं झालं असं की, उंबरगाव येथील समाधान लोहार (वय ३४) यांचा विवाह २०१३ मध्ये सारिका (वय ३२) हिच्याशी झाला होता. विवाहानंतर काही वर्षांनी सारिका व तिची सासू विमल यांच्यात वादाच्या ठिकऱ्या उडत होत्या. त्याला कारण होते, ते सारिका हिचे साधारण दोन वर्षांपासून गावातील शेखर चंदनशिवे याच्याशी प्रेमसंबंध असण्याचे. या टप्प्यावर १० जानेवारी २०२६ रोजी




सकाळी प्रियकर शेखर चंदनशिवे याने प्रियशी सारिकाला शेतात बोलावून पांढऱ्या रंगाचे विषारी औषध असलेली अर्धवट भरलेली बाटली दिली. आपल्या प्रेम प्रकरणाला आड येणाऱ्या सासुला कायमचं संपवण्यासाठी हे विषारी द्रावण पिण्याच्या पाण्यात टाक, असे त्यानं तिला सांगितलं. तिथंच दोघांचा सासू विमल हिला कायमचे संपवण्याचा कट रचला गेला.


(अधिक वृत्त पान ७ वर...)

### विषाचं पाणी तपासणीसाठी प्रयोगशाळेकडं

सासू विमल हिला मारण्यासाठी सून सारिका हिचा प्रियकर शेखर यांनं मक्याच्या पिकातील तण नष्ट करण्यासाठीचं आणि जनावरांच्या पोटामधील जंत कमी करण्यासाठी आणलेलं औषध एकत्रित करुन बाटलीमधून दिलं होतं. ती बाटली आणि त्यामधील राहिलंलं औषध रासायनिक प्रयोगशाळेकडं तपासणीला दिलं आहे. संशयित दोन्ही आरोपींना आज सोमवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. गुन्ह्याच्या अनुषंगाने, आणखीन तपास करीत आहोत. साधारण दोन वर्षांपासून सारिका आणि शेखर यांच्यामध्ये संबंध होते. त्याला सासू विमला अडथळा होता. त्यांना संपवण्यसाठी कट रचला होता.

**–प्रशांत डगळे,**
उपविभागीय पोलीस अधिकारी, पंढरपूर





मृत समाधान लोहार व घटना घडलेली हीच ती जागा.

- सासूला संपवण्याचं रचलं कांड पण नवराच संपला!
- विषप्रयोग करायला गेली एकीवर घडलं दुसरंच
- उंबरगाव लव्ह स्टोरी थरारानं खळबळ
- कट रचणारे दोघे प्रेमीयुगल गेले ‘बाराच्या भावात’

### नातेवाईकांनी ‘डीवायएसपी’ना गाठलं अन् कांडाच्या घटनेचं बिंग फुटलं!

मृत समाधान लोहार यांच्या मृत्यू प्रकरणी पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला नव्हता. या प्रकरणाची चौकशी करण्यासंदर्भात पोलिसांकडून टाळाटाळ सुरु होती, असा नातेवाईकांचा आरोप होता. महिना उलटून गेला तरी घटनेचा उलगडा होता नव्हता. मृत समाधान यांचे नातेवाईक यातून अस्वस्थ होते. मात्र दोषींना शिक्षा मिळायलाच हवी, अशी त्यांची ठाम भूमिका होती. याच पार्श्वभूमीवर, नातेवाईकांनी उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांची भेट घेऊन समाधान याचा घातपात झाला असून याबाबत ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यास पोलीस टाळाटाळ करत असल्याचे सांगितले. याची गंभीर दखल घेऊन डगळे यांनी या प्रकरणाची चौकशी करून गुन्हा दाखल करण्याचे आदेश पोलीस निरीक्षक रेखा घनवट यांना दिले यानंतर या प्रकरणाची चौकशी सुरू झाली आणि त्यातून प्रेमाच्या लफड्यातून रचलेल्या कांडाचे भिंग फुटले.

### सारिका अन् शेखरला चार दिवसांची पोलीस कोठडी

समाधान लोहार यांच्या मृत्यू प्रकरणाच्या अनुषंगाने, पत्नी सारिका लोहार व तिचा प्रियकर शेखर चंदनशिवे या दोघांना अटक केली आहे. दोघा संशयित आरोपींना पंढरपूर न्यायालयात उभे केले असता मा. न्यायालयाने त्यांना चार दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक रेखा घनवट यांच्या मार्गदर्शनाखाली करत आहेत.